प्रेसनोट

जा.क्र.२८६/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २३/०४/२०१७

## ''मोबाईल पोलीस स्टेशन''
## (फिरते पोलीस स्टेशन)

भंडारा:— पोलीस स्टेशन भंडारा येथील दवडीपार (बेला) येथे फिरते पोलीस स्टेशनचे चे उद्घाटन विशेष पोलीस महानिरीक्षक नागपुर परीक्षेत्र नागपुर मा. श्री.पाटणकर सा. यांच्या हस्ते करण्यात आले सदर कार्यक्रमा करिता गावातील सरपंच श्री. सुनिल लेंडे उपसरपंच तंटामुक्ती अध्यक्ष श्री. चरण निबांर्ते, पोलीस पाटील पोमराज शेंडे हे हजर होते तसेच श्रीमती विनीता साहू पोलीस अधिक्षक भंडारा,अप्पर पोलीस अधिक्षक भंडारा,रश्मी नांदेडकर,उपविभागिय पोलीस अधिकारी श्री.जोगदंड उपविभाग भंडारा, उपविभागिय पोलीस अधिकारी श्री.साळी उपविभाग तुमसर, पोलीस निरीक्षक श्रीमती चांदपुरकर मॅडम हे उपस्थित होते.

सदर नुक्कड पोलीस स्टेशन कार्यक्रम दरम्यान उपस्थित नागरिकांना आयोजित नुक्कड पोलीस स्टेशनचे संकल्पने बाबत माहिती देण्यात आली.श्री. विष्णु लोनारे सामाजिक कार्यकर्ता यांनी अंधश्रध्दा निर्मुलनचे चे प्रयोग करून दाखविले तसेच पोलीस बॉईज संघटनाच्या वतीने कलापथका व्दारे पथनाटय सादर करण्यात आले.

मा. विशेष पोलीस महानिरीक्षक नागपुर परीक्षेत्र नागपुर मा. श्री. पाटणकर सा.यांनी मार्गदर्शन केले की, प्रत्येक शनिवारी तक्रार निवारन दिन घेण्यात येत होते.त्यामध्ये लोकांना पोलीस स्टेशनला येवुन तक्रार दयावी लागत होती परंतु सध्या नुक्कड पोलीस स्टेशनचे मार्फत पोलीस स्टेशन आपल्या गावी आले असुन माहाराष्ट्रात पहील्यांदाच ही संकल्पना राबविण्यात आलेली आहे याबाबत मा.पोलीस अधिक्षक श्रीमती विनीता साहू यांचे कौतुक केले.

मा.पोलीस अधिक्षक श्रीमती विनीता साहू यांनी मार्गदर्शन केले की,आपल्या गावात फिरते पोलीस स्टेशन संकल्पना राबविण्यात आली असुन आपण कोणत्याही विभागाचे तक्रारी नोंदवु शकता सदर तक्रारीचा आम्ही पाठपुरावा करू तसेच पीसीआर ॲप,पोलीस मित्र व इतर महत्वाची माहिती देवुन फिरत्या मोबाईल पोलीस स्टेशनचे महत्व व फायदे त्यांचा उद्देश समजावुन नागरीकांना फिरते मोबाईल पोलीस स्टेशन मध्ये लेखी किंवा तोंडी स्वरूपात तक्रारी सादर करण्याचे आव्हान करण्यात आले

सदर मोबाईल पोलीस स्टेशनचे कार्यक्रमांत मौजा दवडीपार (बेला) येथिल १०० ते १५० नागरीक व १० प्रतिष्ठीत नागरिक उपस्थित झाले होते नुक्कड पोलीस स्टेशन मधुन सकाळी १०.०० ते १७.०० वा. पर्यत एकुन ७ तक्रारी प्राप्त झाल्या होत्या तक्रारीचे अवलोकन केले असता सदरच्या तक्रारी हया महसुल विभागाशी संबधित असल्याने योग्य कार्यवाही करिता महसुल विभागाकडे सोपविण्यात आले आहे.

२३-४.
सपोनि. के. एम.हत्तीमारे
जि. वि. शा भंडारा करीता
दुरध्वनी.क्र.९४२२८३२१७८

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.